भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुंपार )

जा.क्र. ११८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०२/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन रेतीचे ट्रक घेवुन जाण्याकरीता शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे २०.३० ते २१.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी शैलेश शंकरराव उपासे वय ३५ वर्ष, रा. अडयाळ हा रेती चेकवर पोस्ट वर डयुटी करीत असतांना यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन १० ते १५ लोकांनी बॅरीकेटस बाजुला करुन फिर्यादी हा रेतीचे ट्रक तपासणी करीत असतांना आरोपीतांनी आमचे ट्रक ला का थांबवीले ट्रक जावु दया असे म्हणुन बॅरीकेट्स काढुन शासकीय कामात अडथळा करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,१८६,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कळवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकाल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा भाऊ जखमी देवानंद राजीराम लिचडे वय ३३ वर्ष रा. कोंढा यांचे मोटार सायकल क्र. एमएच. ३६ एन ७४४३ ला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी नरेश राजीराम लिचडे वय ३० वर्ष रा. कोंढा यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान मुलीचा मृत्यु . :–**

दिंनाक ०८/०२/२०१७ चे १७.१५ वा. दरम्यान यातील मृतक कु. पोर्णीमा शामराव सावरबांधे वय १८ वर्ष रा. गुडेगाव हीने अभ्यासाचे टेंशन घेवुन उंदीर मारण्याची विषारी औषध खाल्याने तिला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०९/०२/२०१७ ला मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाला व्दारे पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे १७४ कलम जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. गिते पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.